29 MAY 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर




शिवाजी विद्यापीठात बुधवारी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

29 MAY 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठात आज स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2025
तरुण भारत

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2025
पुण्यनगरी

## शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात बुधवारी वि. दा. सावरकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. जयप्रकाश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या २९० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी विविध ३८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, तर एकूण २९० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. तसेच दिवसभरात विविध ४९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १८३ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी १८ हजार ९५ विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बीए., बीएस्सी., एमबीए., बीई., एमटेक., डिप्लोमा कोर्स इन पोर्तुगीज, डिप्लोमा इन म्युझिक, डिप्लोमा इन हिंदी ट्रान्सलेशन अशा ४९ अभ्यासक्रमाची १८३ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. १८ हजार ९५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. भरारी पथकाकडून एकाही गैरप्रकाराची नोंद झालेली नाही. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी २९० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे.



29 MAY 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवनसत्त्व संशोधनासाठी डॉ. गजरे, डॉ. जगधने यांना पेटंट

## पाण्यामधील जीवनसत्त्व बी-२ याचा सेंद्रिय संयुग वापरून शोध घेणे झाले सोपे

**आजरा : पुढारी वृत्तसेवा**

आजरा महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. शिवानंद गजरे आणि यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड महाविद्यालयातील डॉ. किशोर जगधने यांना 'डिव्हाईस फॉर डीटेक्शन ऑफ व्हिटॅमिन बी-२ इन वॉटर' या संशोधनासाठी भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले.

शरीरामध्ये जीवनसत्त्व बी-२ पर्याप्त ऊर्जास्तर राखून ठेवण्यास मदत करतो, जे शरीराच्या सामान्य कार्य व गतिविधींना साहाय्य करते. तसेच शरीरात जीवनसत्त्व बी-२ च्या इतर घटकांचे सामान्य स्तर राखून ठेवण्यास मदत करते. जसे की बी-६ आणि बी-९ शरीरात वापरू शकल्या जाणाऱ्या त्यांच्या सक्रिय रूपांमध्ये परिवर्तित करून हे साध्य केले जाते.

अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित एका अभ्यासामध्ये दिसून आले आहे की, रायबोफ्लेविन लोहाचे प्रयाप्त रक्त स्तर राखून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. कारण, शरीरात लोहाच्या प्रक्रियेवर त्याचा प्रभाव होतो. या जीवनसत्त्वाची कमतरता रक्ताशयाच्या अधिक धोक्याशी निगडित आहे. याशिवाय या जीवनसत्त्वाची एक विशिष्ट भूमिका मायग्रेन्सचे प्रबंधन आणि निवारण यामध्ये सूचविण्यात आले आहे. इतर औषधांसह मायग्रेन आघातावर निवारात्मक उपचार पद्धत म्हणून वापरले जाते. या आघाताची वारंवारिता व भार कमी करण्यात यशस्वी ठरले आहे.




डॉ. शिवानंद गजरे डॉ. किशोर जगधने

जीवनसत्त्व बी-२ कमतरतेमुळे थकवा, सुजलेला घसा, अस्पष्ट दृष्टी आणि नैराश्यपणा येऊ शकतो. तोंडाभोवती त्वचेला तडे, खाज सुटणे आणि त्वचारोग होऊन त्वचेवर परिणाम होऊ शकतो. त्याचे रूपांतर कॅन्सर सारख्या गंभीर आजारावर होऊ शकते. याची दखल घेत पाण्यामधील जीवनसत्त्व बी-२ याचा सेंद्रिय संयुग वापरुन शोध घेणे सोपे केले.

या संशोधनाकरिता शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. जी. बी. कोळेकर, प्रा. डॉ. पी. व्ही. अनभुले यांचे मार्गदर्शन मिळाले. डॉ. ए. व्ही. माळी, डॉ. एस. एच. बुरुंगले, आजरा महाविद्यालय आजराचे अध्यक्ष अशोक चराटी, प्राचार्य डॉ. ए. एन. सादळे, कार्यालयीन अधीक्षक योगेश पाटील यांचे सहकार्य मिळाले.

# यिन समर समीटमध्ये होणार तरुणाईचा जल्लोष

## नोंदणीला उस्फूर्त प्रतिसाद : ३ व ४ जून रोजी शिवाजी विद्यापीठात आयोजन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : 'सकाळ माध्यम समूहा'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) समर यूथ समीट ३ व ४ जून रोजी होत आहे. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नाव नोंदणीची अंतिम मुदत २ जूनपर्यंत आहे. डॉ. पियु हेल्थ क्लिनिक समीटचे मुख्य प्रायोजक असून, पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटी पॉवर्ड बाय हे समीट आहेत. विद्याप्रबोधिनी यांच्या सहकार्याने ते होत आहे. ट्रिनिटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, फ्युएल बिझनेस स्कूल, महा एनजीओ फेडरेशन सहप्रायोजक, शिवाजी विद्यापीठ व्हेन्यू, संजीवन नॉलेज सिटी (पन्हाळा) हॉस्पिटॅलिटी, तर जनता सहकारी बँक लिमिटेड बँकिंग पार्टनर आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात समीट होणार आहे.

समीटमध्ये तरुणाई आणि अध्यात्म, भावनिक आणि मानसिक स्वास्थ्य, सृजनात्मक विचार, योगा, सामाजिक-आर्थिक साक्षरता, स्टार्टअप, राजकीय संतुलित जीवनशैली अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शक, सेलिब्रिटी, प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.




### नोंदणीसाठी संपर्क

■ समर यूथ समीटसाठी नाव नोंदणी करण्यासाठी ९९९ रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे. यात कॉलेज सॅक, डायरी, प्रमाणपत्र, चहा व नाश्ता, जेवण, निवास व्यवस्था, ओळखपत्र दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी यिन सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड (९९७५१३१२७०) यांच्याकडे कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग, यिन समन्वयक ऋषिकेश मोरे (९९२३७५१७६०) सातारा, तर यिन समन्वयक अभिजित शिंदे (९९६०७९७३०७) यांच्याकडे सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.




"यिन समीटच्या माध्यमातून केवळ शैक्षणिक नव्हे, तर सांस्कृतिक कार्य होत आहे. महाराष्ट्राच्या गाव, खेड्यातील, ग्रामीण भागातील तरुणांपासून मेट्रो सिटीतील तरुणांचा या समीटमध्ये सहभाग आहे. यांद्वारे विचारांचे आदानप्रदान होईल. एक सुसंस्कृत युवा पिढी घडविण्याचे अमूल्य कार्य यिनद्वारे होत आहे." यिन समर युथ समीट २०२५ ला हार्दिक शुभेच्छा.

**- प्रा. प्रवीण बी. चेवारी**, उपप्राचार्य, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, वाठार तर्फ वडगाव



"दरवर्षी यिनतर्फे समर समीट घेतले जाते. ही एक तरुणाईसाठी संधी असते. व्यक्तिमत्त्व विकासाची ही संधी तरुणाईने साधून सर्वच पातळ्यांवर व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी या समीटमध्ये सहभागी झाले पाहिजे. यिन हे तरुणाईमध्ये नेतृत्व गुण विकसित करते, यासाठीही समर समीटमधून तरुणाईला दिशा मिळेल.

**- डॉ. पूजा नरवाडकर**, प्राचार्या, भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, सांगली



"सध्या सुटीचा काळ सुरू आहे. याच काळात यिनने तरुणाईच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे यिन समर समीटचे आयोजन केले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या समीटमध्ये तरुणाईला विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

**- डॉ. राजकुमार बगली**, प्राचार्य, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर



"समर युथ समीटमधून विद्यार्थ्यांचे ज्ञान कौशल्य वाढणार असून, विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या नावीन्यपूर्ण संधीबाबत मार्गदर्शन मिळेल. तसेच विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण विकासासाठी तिथेच प्रेरणा मिळणार आहे. तरुणाईचा उत्सव असलेल्या 'यिन समर समीट'मध्ये तरुणाईने नक्कीच सहभागी झाले पाहिजे.

**- सुरेश भालचीम**, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर



"सकाळ समर युथ समीट-२५ हे विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान व्यासपीठ आहे. या उपक्रमात कौशल्य विकास, योग व मेडिटेशनसह उद्योजकतेविषयी सखोल ज्ञान मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही उत्तम संधी आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या समीटमध्ये सहभागी व्हावे.

**- डॉ. शरद मुळीक**, प्राचार्य, अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा